| MHKO200003442024 | **नियमीत दिवाणी दावा क्रं. ६१/२०२४ मधील नि.१७ खाली आदेश**<br>**श्रीमती कासुबाई शामराव पोवार विरुध्द किरण नामदेव पोवार** |
|---|---|

**०१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'विना म्हणणे' आदेश आदेश रद्द करणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांचे भाऊ आदेश झालेल्या तारखेच्या दोन दिवस अगोदर मयत झाले होते. त्यामुळे प्रतिवादी यांना मुदतीत म्हणणे देता आले नाही. तसेच प्रतिवादी हे शेतकरी असल्याने शेतीच्या कामामुळे वेळेत कोर्टात हजर राहून म्हणणे देता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी म्हणणे देणेस जाणुन बुजुन म्हणणे देणेस विलंब केलेला नाही. प्रतिवादी यांना म्हणणे दाखल करणेस संधी दिलेस सदरचा दावा गुणदोषावर चालणेस मदत होणार आहे. याउलट सदरचा अर्ज नामंजूर केलेस प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होणार असून प्रतिवादी यांच्या न्याय हक्कावर गदा येणार आहे. सदरचा अर्ज मंजूर झालेस सदरचा दावा गुणदोषावर चालणेस मदत होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०२.** वादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जात काणेतेही सबळ व संयुक्तीक कारण नमुद केलेले नाही. वादीचा नि.क्रं. १४ चा अर्ज दि. १५.०९.२०२३ रोजी दिला असून प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दि. ०६.०७.२०२४ रोजी दिला असून सदर अर्ज जवळ जवळ १० महिने इतक्या विलंबाने दिला आहे. प्रतिवादी हे हेतुपुरस्कर सदर अर्जास म्हणणे देणेस टाळाटाळ करीत असलेने व मुदतीत म्हणणे दिले नसल्याने त्यांचे विरुध्द 'विना म्हणणे' असा आदेश पारित केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास रक्कम रु.

२,०००/- प्रतिवादीला कॉस्ट करणेत यावी अशी विनंती केली आहे.

**०३.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत मुळ दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता प्रतिवादी विरुध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द करुन सदर प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी सदरचा अर्ज मंजूर करणे उचित होणार आहे. तसेच दाव्याची सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे तसे न केल्यास दाव्यात गुंतागुंत निर्माण होऊन दाव्याच्या न्यायनिर्णय देताना अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे दाव्याच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**०६.** अंतिमरित्या मी खालील प्रमाणे आदेश करते.

**आदेश.**

१. नि.क्रं.१७ चा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला 'विना म्हणणे आदेश' रद्द करण्यात आला.

३. प्रतिवादी यांनी वादी यांना रक्कम रु.३००/- कॉस्ट देणेत यावी.

दि.२१.१२.२०२४.
कळे-खेरीवडे.

(एच.एम.पटेल)
अति.सह.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे-खेरीवडे.